दिवाणी दावा क्र.156/2019
CNR No.MHLA130008442019
रबियाबी वि. रज्जाक+3

निशाणी क्र.23 वर आदेश
(दि.23-11-2023)

1. वादीने निशाणी क्र.20 वर दिवाणी प्रक्रिया संहिताचे क्रम 6 नियम 17 अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे दिले नाही. त्यामुळे सदर अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्या शिवाय पुढे चालेल असे आदेश दिनांक 09-10-2023 रोजी पारित करण्यात आले आहेत.

2. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दाखल केला असून त्यांनी सदर दिनांक 09-10-2023 रोजीचे म्हणणे नाही असे आदेश रद्द करावेत ही विनंती केली आहे. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी काही अपरिहार्य कारणास्तव दिनांक 09-10-2023 रोजी न्यायालायत हजार राहू शकले नाहीत म्हणून म्हणणे देऊ शकले नाहीत. वादीने दाखल केलेल्या निशाणी क्र.20 वर म्हणणे देण्याचा प्रतिवादिस कायदेशीर अधिकार आहे. त्यांना संधि नाही दिल्यास प्रतिवादींचे नुकसान होईल. सबब दिनांक 09-10-2023 रोजी पारित करण्यात आलेले म्हणणे नाहीत असे आदेश रद्द करावेत आणि प्रतिवादींणा अर्ज निशाणी क्र.20 वर म्हणणे देण्याची संधि द्यावी.

3. वादीने अर्जाच्या पाठीमागे म्हणणे दिले व अर्जास आक्षेप घेतला आहे. वादीचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादींनी जाणून बुजून निशाणी क्र.20 वरील अर्जावर म्हणणे दिले नाही. प्रतिवादी येण केण प्रकारे दाव्यास विलंब करीत आहेत. प्रतिवादींनी सांगितलेले कारण संयुक्तिक नाही, म्हणून अर्ज रुपये 2000/- खर्च बसवून नामंजूर करावा.

4. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. युक्तिवाद ऐकला. या ठिकाणी ही बाब महत्वाची आहे की, दावा मालकी घोषित करून मनाई हुकूम मिळणे बाबद चा आहे. त्यामुळे, दाव्यात वादी व प्रतिवादींचे हितसंबंध गुंतलेले आहेत. वादींनी निशाणी क्र.20 वर अर्ज दाखल करून वादपत्रात दुरुस्ती करण्याची परवानगी मागीतली आहे. सदर अर्ज गुण दोषावर निकाली काढणे गरजेचे आहे, आणि त्यासाठी सदर अर्जावर प्रतिवादींणा म्हणणे मांडण्याची संधि देणे जरूरी आहे. परंतु प्रतिवादींनि वेळेत म्हणणे दिले नाही त्यामुळे जो विलंब झाला आहे, त्यासाठी प्रतिवादींवर खर्च बसवून अर्ज मंजूर करणे न्याय्य होईल. सबब एकंदरीत परिस्थितीचा विचार करता पुढील आदेश पारित करण्यात आले.

आदेश

१. प्रतिवादींवर रुपये 300 खर्च बसवून अर्ज मंजूर करण्यात येतो.
२. दिनांक 09-10-2023 रोजीचे निशाणी क्र.20 वर पारित विना म्हणणे चे आदेश रद्द करण्यात येतात.
३. खर्चाची रक्कम प्रतिवादींनि वादींणा दिल्या नंतर प्रतिवादींणा निशाणी क्र.20 वर म्हणणे मांडण्याची संधि दिली जाईल .

(खुल्या न्यायालयात घोषित.)

दि.२३-११-२०२३

सही/-
(रमाकांत बी. हनवते)
दिवाणी न्यायालय क. स्तर रेणापुर